०२८

# पुणे विद्यापीठ
## गणेशखिंड, पुणे — ४११००७.

संदर्भ :— परीक्षा/वाणिज्य/ ४१५२ दि. १०/१२/२०११

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

विषय:— एस.वाय./टी.वाय.बी.कॉम. ऑक्टोंबर २०११ परीक्षेच्या निकालाबाबत

महोदय/महोदया,

**एस.वाय./टी.वाय.बी.कॉम. ऑक्टोंबर २०११** मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक १२/१२/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहिर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येतील.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक १२/१२/२०११ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचे आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक १२/१२/२०११ रोजी दुपारी ११.०० ते २.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखादया विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून दयावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणांस विंनती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक 10/12

10/12/2011

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१.मा.उपकुलसचिव (परीक्षा.२)
२.मा.सर्व सहायक कुलसचिव (परीक्षा.)
३.विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक व अहमदनगर, संबंधित महाविद्यालयांना वेळेवर निकाल देण्याची व्यवस्था करावी.

marathi/result declear/3